# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट ता:-०५/०७/२०२२.

**अल्पवयीन मुलाचा खुन केलेल्या विधीसंघर्षित बालकांना एमआयडीसी भोसरी पोलीसांनी घेतले ताब्यात**

## (एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणेच्या पोलीसांची कारवाई)

**मा.श्री. अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुरनं:-३९०/२०२२ भादंवि कलम ३६३ मधील अपहृत बालकाचा शोध घेणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.** त्या अनुषंगाने पोलीस उपायुक्त सो, श्री. मंचक इप्पर व सहा. पोलीस आयुक्त सो, श्री. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली एस.एस.पांचाळ,सहा.पोलीस निरीक्षक यांनी व त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकातील पोउनि श्री. सचिन चव्हाण यांना एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुरनं:-३९०/२०२२ भादंवि कलम ३६३ मधील फिर्यादी नामे:-मिनाक्षी सतिश बनसोडे रा:-बनकरवस्ती, मोशी, पुणे यांच्या अपहृत बालकाचा शोध घेवुन तात्काळ कारवाई करणेकामी मार्गदर्शन करुन सुचना दिल्या.

**एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणेतील अधिकारी व अंमलदार यांचे वेगवेगळे पथक तयार करुन दाखल गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना मिळालेल्या माहितीवरुन तीन विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता सदर विधीसंघर्षित बालके व अपहृत बालक असे मिळुन एकुण ६ जण दि.०४/०७/२०२२ रोजी दुपारी १४/०० वाजता सुमारास अविष्कार सोसायटीचे बाजूला, बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील निर्जन स्थळी झाडीमध्ये दारु पित बसले असताना त्यांच्यात वाद झाला.त्यावेळी यातील विधीसंघर्षित बालकांनी सोबत आणलेल्या कोयत्याने यातील बालकास डोक्यात मारुन गंभीर जखमी करुन त्याचा खुन केलेबाबत निष्पन्न झाले आहे.तरी यातील तीन विधीसंघर्षित बालकांस ताब्यात घेतले असुन दोन आरोपींचा शोध घेत आहोत.पाहिजे आरोपी यांचा शोध घेणेकरिता वेगवेगळी तपास पथके रवाना केली आहेत.सदर गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक एस.एस.पांचाळ हे करित आहेत.**

**सदरची कारवाई मा. श्री. अंकुश शिंदे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ. संजय शिंदे सो, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री. मंचक इप्पर सो, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड,मा.सागर कवडे सो,सहा.पोलीस आयुक्त,पिंपरी विभाग,पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शना खाली एस.एस.पांचाळ, सहा.पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक श्री. चापाले पोलीस उपनिरीक्षक श्री. सचिन चव्हाण व पोलीस अंमलदार यांनी मिळुन केली आहे.**

**(मंचक इप्पर)**
पोलीस उपायुक्त
परि-१, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner